**ठळक बातम्या**

- राज्य सरकारकडून रबी हंगामाच्या ई पीक पाहणीसाठी ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ
- राज्यातल्या गॅसटंचाईबद्दल विधानसभेत सरकारने निवेदन करावं असे अध्यक्षांचे निर्देश
- लोकसभेत गदारोळ करणाऱ्या ८ विरोधी खासदारांचं निलंबन मागे
- एलपीजी घेऊन नंदादेवी हे भारताचं दुसरं जहाज गुजरातमधल्या वाडीनार बंदरात दाखल
- ज्येष्ठ लेखिका आणि कवयित्री आसावरी काकडे यांचं निधन

**आणि**

- राज्याच्या विविध भागात मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाची शक्यता

**<><><><><>**

राज्य सरकारनं रबी हंगामासाठी पीक पाहणीसाठीची मुदत ३१ मार्चपर्यंत वाढवून दिली आहे. आतापर्यंत केवळ ५५ टक्के क्षेत्राची पाहणी पूर्ण झाल्यानं सरकारनं हा निर्णय घेतला आहे. पीक नोंदणीच्या अभावी नैसर्गिक आपत्ती, पीक वीमा, पीक कर्ज यासारख्या लाभापासून शेतकरी वंचित राहू नये म्हणून हा निर्णय घेतल्याचं निवेदन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत आज दिलं. याबाबत ते म्हणाले…

**होल्ड - बाईट- बावनकुळे**

राज्यात गॅस टंचाईचा मोठ्या प्रमाणात सामना करावा लागत असल्याचा मुद्दा नाना पटोले यांनी विधानसभेत उपस्थित केला. याबाबत सरकारने काल विधानसभेत

निवेदन करणं अपेक्षित होतं, ते कधी करणार असा प्रश्न पटोले यांनी विचारला. तसंच राज्यातील गॅस टंचाईची स्थिती  सभागृहात सविस्तर मांडण्याची परवानगी त्यांनी मागितली. अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ती नाकारली मात्र सरकारने सभागृहात निवेदन करण्याचे निर्देश दिले. बोलण्याची परवानगी नाकारल्यामुळे आणि सरकारने सभागृहात निवेदन न दिल्यामुळे विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सरकारविरोधी घोषणाबाजी करत सभात्याग केला.

**<><><><><>**

राज्यातल्या ८६ हजार अनुदानित शाळांमध्ये प्रधानमंत्री पोषण आहार योजनेंतर्गत पुरवलेल्या पोषण आहारात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप कैलास पाटील यांनी लक्षवेधी द्वारे केला. निविदा प्रक्रियेत १३४ रूपये किलो दराच्या हिरव्या वाटाण्याची नोंद होती मात्र ३० ते ३५ रुपये किलो दराने मिळणाऱ्या पांढऱ्या वाटाण्याचा पुरवठा केला गेला. यामुळे यात शिक्षण संचालक, पुरवठादार यांनी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केल्याचा आरोप पाटील यांनी केला. यावर निविदेत उल्लेख केलेला वाटाण्याचा पुरवठा केला गेला नाही हे शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी मान्य केलं. तसंच या प्रकरणी सचिव स्तरावर चौकशी केली जाईल असं आश्वासन दिलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक, २०२६ आज गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधानपरिषदेत मांडलं. सध्या या विधेयकावर सभागृहात चर्चा सुरू आहे.

जबरदस्तीनं धर्मांतराला आमचा विरोध आहे. मात्र विविध ठिकाणी काम करणाऱ्या धार्मिक संस्था, मोफत शिक्षण देणाऱ्या संस्थांनाही हा कायदा लागू होणार का, हे स्पष्ट होणं गरजेचं असल्याचं मत शशिकांत शिंदे यांनी यावरच्या चर्चेत व्यक्त केलं. काल विधानसभेत हे विधेयक मंजूर झालं आहे.

**<><><><><>**

माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूबद्दल विधानपरिषदेत चर्चा होत नसल्याचा मुद्दा आमदार अमोल मिटकरी यांनी उपस्थित केला. भाई जगताप, सचिन अहिर आणि शशिकांत शिंदे यांनीही यावर भाष्य केलं आणि चर्चा वारंवार पुढे जात असल्यावरून सरकारवर टीका केली. सभापतींनी या चर्चेसाठी दिवस ठरवून द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. यावर लवकरात लवकर निर्णय घेऊ, उद्या किंवा सोमवारी यावर चर्चा होईल, असं सभापती राम शिंदे यांनी सांगितलं.

**<><><><>**

लोकसभेत गदारोळ करणाऱ्या ८ विरोधी खासदारांचं निलंबन मागे घेण्यात आलं. भंडारा गोंदियाचे काँग्रेस खासदार प्रशांत पडोळे यांच्यासह ८ जणांना गैरवर्तन केल्याबद्दल अधिवेशन संपेपर्यंत सभागृहातून निलंबित केलं होतं. हे निलंबन तात्काळ मागे घ्यावं, असा ठराव संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी मांडला आणि तो एकमताने संमत झाला. यासंदर्भात काल सभापती ओम बिरला यांनी बैठक बोलावली होती. त्यावेळी फलक झळकावणार नाही, एआय वापरलेली चित्रं किंवा चित्रफिती सभागृहात दाखवणार नाही, एकंदर सभागृहाची प्रतिष्ठा राखली जाईल, असं वर्तन करण्याचं आश्वासन सर्वपक्षीय नेत्यांनी दिलं असल्याची माहिती सभापतींनी दिली.

**<><><><>**

शेतकऱ्यांसाठीच्या प्रधानमंत्री पीक विमा योजनेत केंद्र सरकारने सुधारणा केली असल्याची माहिती केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी आज लोकसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात दिली. विम्याचे दावे २१ दिवसात निकाली काढणं बंधनकारक असून त्यात उशीर झाला, तर कंपनीला १२ टक्के दराने व्याज द्यावं लागेल, असं त्यांनी स्पष्ट केलं....

**होल्ड- बाईट- चौहान**

शेतकऱ्यांना हमीभाव यंदा वाढवून दिले असून हमीभावाने खरेदी अजूनही सुरु असल्याचं त्यांनी सांगितलं. सरकार वैद्यकीय विम्याला प्राधान्य क्षेत्र मानत असून २०३३ पर्यंत सर्वांना विमा संरक्षण मिळवून देण्यासाठी सरकार काम करत असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. ग्रामीण भागात वैद्यकीय विम्याची उपलब्धता वाढवण्यासाठी सुरु असलेल्या विशेष योजनेअंर्तगत देशभरातल्या २५ हजार ग्रामपंचायतीमध्ये वैद्यकीय विमा उपलब्ध करून दिला जाणार आहे, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

होर्मुझ सामुद्रधुनी पार करून नंदादेवी हे भारताचं दुसरं जहाज आज गुजरातमधल्या वाडीनार बंदरात दाखल झालं. या जहाजावरचा सुमारे ४६ हजार मेट्रिक टन एलपीजी उतरवण्याचं काम सुरु झालं आहे.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या तणावपूर्ण स्थितीमुळे जागतिक दळणवळण आणि नौवहन मार्गात निर्माण झालेल्या अडथळ्यांमुळे अडचणीत सापडलेल्या निर्यातदारांच्या मदतीसाठी बँकिंग उपाययोजना कराव्यात, अशी विनंती भारत चेंबर ऑफ कॉमर्सनं एका पत्राद्वारे भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांना केली आहे.

**<><><><><>**

टपाल खात्यानं २४ तासात किंवा ४८ तासात पत्र आणि वस्तू पोहोचवण्याची सुविधा सुरू केली आहे. दिल्ली, मुंबई, चेन्नई, कोलकाता, बेंगळुरू आणि हैदराबादमध्ये आजपासून या सेवेला सुरुवात झाली. केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत या सेवेचं उद्घाटन झालं. यात पत्र किंवा वस्तू

मिळाल्याची खात्री ओटीपी द्वारे केली जाणार आहे. या गोष्टी पोहोचवण्यात उशीर झाला तर पैसे परत देण्याची सुविधाही टपाल खात्यानं उपलब्ध करुन दिली आहे.

<><><><><>

ठाणे आणि मुलुंड दरम्यान बांधण्यात येत असलेल्या नवीन रेल्वे स्थानकाला धर्मवीर आनंद दिघे स्थानक असं नाव देण्याची मागणी शिवसेना खासदार नरेश म्हस्के यांनी काल संसदेत केली. तसंच ठाणे स्थानकाच्या आधुनिकीकरणासाठी अमृत भारत स्टेशन योजने अंतर्गत सादर केलेल्या ९४९ कोटी रुपयांच्या प्रस्तावाला लवकरात लवकर मंजुरी मिळावी असं ते म्हणाले. ठाणे स्थानकावरील आपत्कालीन वैद्यकीय क्लिनिक पुन्हा सुरू करणे, कोविड-१९ काळात बंद करण्यात आलेल्या ज्येष्ठ नागरिक सवलती पुन्हा सुरू करणे यासह इतर मागण्याही नरेश म्हस्के यांनी यावेळी केल्या.

<><><><><>

ज्येष्ठ लेखिका आणि कवयित्री आसावरी काकडे यांचं पुण्यात अल्पशा आजारानं निधन झालं. त्या ७७ वर्षांच्या होत्या. मराठी आणि हिंदी भाषेत साहित्यरचनेखेरीज त्यांनी दोन्ही भाषामधलं उत्तम साहित्य परस्परात अनुवादित केलं होतं. त्यांच्या कविता शालेय अभ्यासक्रमातही समाविष्ट झाल्या होत्या. चंद्रप्रकाश देवल यांच्या बोलो माधवी या काव्यसंग्रहाचा त्यांनी केलेल्या अनुवादाला साहित्य अकादमीचा अनुवादासाठीचा पुरस्कार मिळाला होता. राज्यशासनाच्या साहित्य पुरस्कारांसह अनेक पुरस्कार त्यांना मिळाले होते.

<><><><><>

पालघर जिल्ह्यातल्या तारापूर औद्योगिक क्षेत्रातल्या एका कंपनीत आज सकाळी आग लागून त्यानंतर काही स्फोटही झाले. आतापर्यंत जीवितहानीची अधिकृत माहिती मिळालेली नाही. या आगीची झळ आजूबाजूच्या कंपन्यांनाही लागली. पोलिसांनी कंपनी परिसर सील केला असून सुरक्षेच्या दृष्टीने नागरिकांना

घटनास्थळापासून दूर राहण्याचं आवाहन केलं आहे.  लाईट डिझेल ऑइल या ज्वलनशील इंधनाच्या साठ्यातून ही आग भडकल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

**<><><><><>**

रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा म्हणून अस्मिता केंद्रे आणि उपाध्यक्ष म्हणून विलास चाळके यांची बिनविरोध निवड झाली असून, त्यांनी काल पदभार स्वीकारला.शिवसेनेच्या या उमेदवारांची  निवड १५ महिन्यांसाठी करण्यात आली आहे.

**<><><><><>**

राज्याच्या विविध भागात मेघगर्जना आणि  विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस होण्याची शक्यता असून वादळी पावसाचा ऑरेंज अलर्ट हवामानशास्त्रविभागाने जारी केला आहे. राज्यात अनेक ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता असून शेतकऱ्यांनी त्यादृष्टीनं नियोजन करावं असं राज्यशासनाच्या कृषी विभागाने सांगितलं आहे.

**//<><><><><>//**